# साधना विद्यालयात वाद-विवाद स्पर्धा

**हडपसर :** पंख सामाजिक संस्था आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळांगण प्रकल्पाअंतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या हडपसर येथील साधना विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांची जाणीव निर्माण व्हावी, संवाद कौशल्य वाढावे व अभ्यासाव्यतिरिक्त इतर विषयांचे वाचन मुलांनी करावे, या हेतूने 'गणेश उत्सव साजरा करावा की नाही' या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये गणेश उत्सवामुळे कुटुंबात एकता निर्माण होते, रोजच्या व्यस्त जीवनामुळे निर्माण होणारा ताण कमी होतो, गणेश मूर्तीचा सांस्कृतिक अर्थ यासारखे मुदे सांगून आपली बाजू पटवून दिली, तर दुसऱ्या गटाने गणेश उत्सवामुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत, होणाऱ्या अपघाताबाबतचे दाखले देऊन आपली बाजू मांडली.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून पंख संस्थेच्या ट्रस्टी कल्याणी भावड व साधना विद्यालयाच्या शिर्के यांनी काम पहिले. पंख संस्थेतर्फे मुलांना पारितोषिके देण्यात आली. बक्षीस वितरण शाळेचे उपमुख्याध्यापक संजय कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन सचिन भापकर आणि कौस्तुभ जोगळेकर यांनी केले.